महिला व बाल विकास विभागाच्या अधिपत्याखालील ,महिला व बाल विकास अधिकारी,जिल्हा परिषद बीड या पदावर प्रतिनियुक्ती नियुक्ती देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास विभाग

शासन आदेश क्रमांक : मबाआ- २०१८/प्र.क्र.८०/कार्या-७

हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : ३१ मे, २०१८.

संदर्भ-१. महिला व बाल विकास विभाग शा.नि.क्र. मबाआ-२०१५/प्र.क्र.१५१(भाग-२)/का.७, दि.०५.०६.२०१६
२.महिला व बाल विकास विभाग शा.शु.पत्र. मबाआ-२०१५/प्र.क्र.१५१(भाग-२)/का.७, दि.१३.०७.२०१६

शासन आदेश

श्री. सी. एस. केकान, गट विकास अधिकारी, पंचायत समिती पाटोदा ,जिल्हा बीड यांची महिला व बाल विकास विभागाच्या अधिपत्याखालील महिला व बालविकास अधिकारी,जिल्हा परिषद, लातूर या पदावर प्रथमत: दोन वर्ष अथवा सदर पदावर सरळसेवेने अधिकाऱ्याची नियुक्ती होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंतच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली होती. सदर प्रतिनियुक्ती प्रशासकीय कारणास्तव संपुष्टात आण्यात येत असून या आदेशान्वये श्री. सी. एस. केकान यांची महिला व बालविकास अधिकारी,जिल्हा परिषद बीड येथे प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे.

सदर प्रतिनियुक्ती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

अ) उपरोक्त अधिकारी ज्या तारखेला प्रतिनियुक्तीच्या पदावर रुजू होतील त्या तारखेपासून प्रतिनियुक्ती सेवेचा प्रारंभ होईल. त्यांनतर प्रतिनियुक्ती पदाचा कार्यभार सुपूर्द करुन त्यांच्या मूळ विभागात ज्या तारखेला रुजू होतील त्या तारखेला त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी समाप्त होईल.

ब) जर त्यांच्या सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यांना परत बोलावून घेण्याचा अधिकार/ सक्षम प्राधिकारी राखून ठेवील.

क) जर त्यांची सेवा स्वीयेतर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही तर, त्यांना मूळ विभागाकडे परत पाठविण्याची मुभा स्वीयेतर नियोक्त्याला राहील. मात्र, याप्रमाणे परत पाठविण्यापूर्वी स्वीयेत्तर नियोक्त्याने शासनाला / सक्षम प्राधिकाऱ्याला तीन महिन्यांची नोटीस दिली पाहिजे, आणि

ड) त्यांनी मूळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्देश आहे अशी कमीत कमी तीन महिन्यांची नोटीस शासनाला / सक्षम प्राधिकाऱ्याला दिल्यानंतर त्यांना मूळ विभागाकडे परत येण्याची मूभा राहिल.

२. उपरोक्त अधिकाऱ्यांच्या इतर सर्व प्रशासकीय बाबी ग्राम विकास विभाग तसेच महिला व बाल विकास विभागामार्फत हाताळण्यात येतील.

३. सदरची प्रतिनियुक्ती विनंतीनुसार असल्याने सदर अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्ती भत्ता अनुज्ञेय राहणार नाही. तसेच वेतनभत्ते, राजप्रवास सवलत, वैद्यकीय सवलत, गटविमा योजना इ. सेवा विषयक बाबी संदर्भात त्यांच्या मूळ सेवेचे नियम लागू असतील.

४. सदर संबंधित अधिकाऱ्यांनी नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ हजर होवून तसा अहवाल शासनास सादर करावा.

५. सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०६०११४२६२३३१३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2018.06.01 16:18:28 +05'30'

(ला.रा.गुजर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय,मुंबई
२) सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३) आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे
४) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, बेलापूर, नवी मुंबई
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड/लातूर
६) मा.मंत्री, (म.व.बा.वि), यांचे खाजगी सचिव महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७) मा.राज्यमंत्री, (म.व.बा.वि), यांचे खाजगी सचिव महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८) श्री. सी.एस.केकान, महिला बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद लातूर
९) महालेखापाल १ / २ (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखापरिक्षा), मुंबई / नागपूर
१०) जिल्हा कोषागार अधिकारी, बीड
११) निवड नस्ती का-७